दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • बुधवार दि.५ नोव्हेंबर २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक ७५ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Wednesday 5 Nov 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 75 • Pages 4 • Rate 4 Rs

## मतदार यादीत डिलिशन नव्हे तर केवळ डिशन

**मुंबई**–चंद्रशेखर बावनकुळे मंगळवारी सकाळी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, महाविकास आघाडीच्या नेत्यांनी लोकसभेची निवडणूकी झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी निवडणूक आयोगाची भेट घेण्याची गरज होती. आमच्या जागा निवडून आल्या असल्या तरी मतदार यादी चुकलेली आहे. मतदार यादीत अनेक ठिकाणी दुबार, तिबार नावे आहेत अशी तक्रार त्यांनी करणे अपेक्षित होते. पण या प्रकरणी पहिला आक्षेप विरोधकांनी नव्हे तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नोंदवला. त्यांनी हायकोर्टात पहिली याचिका दाखल केली. त्यानंतर मी, आशिष शेलार व किरीट सोमय्या यांनी या प्रकरणी केंद्रीय निवडणूक आयोगाची भेट घेतली. त्यात मतदार यादीत डिलिशन नव्हे तर केवळ डिशन होत असल्याची बाब आयोगाच्या निदर्शनास आणून दिली.

# राज्यात आचारसंहिता लागू
## २४६ नगरपरिषद, ४२ नगरपंचायतींसाठी होणार मतदान
## २ डिसेंबरला मतदान, ३ डिसेंबरला मतमोजणी

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतींच्या निवडणुकीचे अधिकृत वेळापत्रक मंगळवारी जाहीर केले. २ डिसेंबर रोजी मतदान होईल, तर दुसऱ्याच दिवशी, म्हणजेच ३ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे.राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता या सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या कार्यक्षेत्रात मंगळवारपासून आचारसंहिता लागू झाली आहे, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी येथे पत्रकार परिषदेत केली. येथील सचिवालय जिमखान्यात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यावेळी उपस्थित होते.

वाघमारे यांनी सांगितले की, या निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास १० नोव्हेंबर पासून सुरुवात होईल. नामनिर्देशपत्र दाखल करण्याची अंतिम तारीख १७ नोव्हेंबर असेल. नामनिर्देशनपत्रांची छाननी १८ नोव्हेंबर रोजी होईल. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध अपील नसलेल्या ठिकाणी २१ नोव्हेंबरपर्यंत तर अपील असलेल्या ठिकाणी २५ नोव्हेंबरपर्यंत नामनिर्देशनपत्रे मागे घेता येतील. मतदान २ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत मतदानाची वेळ असेल. मतमोजणी सर्व संबंधित ठिकाणी ३ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजेपासून सुरु होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या क्षेत्रापुरती



आचारसंहिता संपुष्टात येईल.निवडणूक होत असलेल्यांपैकी १० नवनिर्मित नगरपरिषदा आहेत. उर्वरित सर्व २३६ नगरपरिषदांची मुदत संपली आहे. न्यायालयीन प्रकरणामुळे पातूर (जि. अकोला) नगरपरिषदेची निवडणूक प्रक्रिया प्रलंबित आहे. त्याचबरोबर एकूण १४७ पैकी ४२ नगरपंचायतींसाठी निवडणूक होत आहे. निवडणूक होत असलेल्यांपैकी १५ नवनिर्मित तर उर्वरित सर्व २७ नगरपंचायतींची मुदत यापूर्वीच संपली आहे. १०५ नगरपंचायतींची मुदत अद्याप संपलेली नाही. निवडणुकांच्या तयारीच्या अनुषंगाने राजकीय पक्षांच्याही प्रतिनिधींशीही संवाद साधण्यात आला आहे. असेही वाघमारे यांनी सांगितले.उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया १० नोव्हेंबरपासून सुरू होईल आणि १७ नोव्हेंबरला अर्ज भरण्याची शेवटची तारीख असेल. १८ नोव्हेंबरला अर्जांची छाननी होईल आणि उमेदवारांना २५ नोव्हेंबरपर्यंत आपली नावे मागे घेता येतील. मतदार यादी तयार करण्यासाठी १ जुलै ही कट-ऑफ तारीख निश्चित करण्यात आली आहे, ज्यामध्ये सध्या सुमारे १.०३ कोटी पात्र मतदारांचा समावेश आहे.राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी सचिव सुरेश काकानी यांच्यासह घोषणा करताना स्पष्ट केले की, मतदान ईव्हीएम वापरून केले जाईल, परंतु व्हीव्हीपीएटी प्रणाली वापरली जाणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सध्याच्या कायद्यांमध्ये व्हीव्हीपीएटीला परवानगी नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. या २४६ नगर परिषदांपैकी १० तर ४२ नगर पंचायतींपैकी १५ नव्याने स्थापन झालेल्या आहेत, असेही वाघमारे यांनी सांगितले.

## सौ.प्रीती मस्के आशा स्वयंसेविका यांचा समाज कार्यास प्रोत्साहन देत केला वाढदिवस साजरा

दैनिक वादळ वार्ता
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आशा स्वयंसेविका सौ. प्रीती प्रशांत मस्के राहणार धावडी प्राथमिक आरोग्य केंद्र भावठाणा अंतर्गत गावामध्ये गाव पातळीवर आरोग्य सेवेची धुरा सांभाळणाऱ्या आरोग्य विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली गावा मध्ये आरोग्यसेवा योजनेची माहिती देणाऱ्या आरोग्य विभागाकडून येणाऱ्या प्रत्येक योजना गावात राबविणाऱ्या स्वतःहून पुढाकार घेऊन महिलांमध्ये सशक्तीकरण महिला व किशोरवयीन मुला मुलींना आरोग्य विषयी योग्य ते मार्गदर्शन करणाऱ्या तसेच गावातील वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिकांना गाव पातळी वर आरोग्यसेवा पोहोचविण्याचे काम करणाऱ्या जननी सुरक्षा योजना अंतर्गत सेवा देणे (एच बी एन सी )
(एच बी वाय सी) आयुष्यमान कार्ड,आभा कार्ड योजना गावामध्ये राबवणे असे अनेक कार्य राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत विवीध कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या आशा




स्वयंसेविका सौ.प्रिती मस्के यांना सर्व स्तरातून वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी विविध स्तरातील महिला यांच्याकडुन अभिष्टचिंतन करुन त्यांच्या समाज कार्यासाठी प्रोत्साहन देत आपल्या शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

## श्रमदानातून ग्रामस्थांनी तयार केला बारीसुरगस ते डोगोफलीपाड्याचा रस्ता

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

अक्कलकुवा तालुक्यातील बारीसुरगस ते डोंगोफलीपाडा दरम्यान चार वर्षांपुर्वी श्रमदानातून तयार केलेल्या मातीच्या रस्त्यावर पुन्हा ग्रामस्थांनी श्रमदानातून रस्त्याची दुरुस्ती केली असुन त्यावर शासनाने किमान आता तरी खडीकरण व डांबरीकरण करुन पक्का रस्ता तयार करावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अक्कलकुवा तालुक्यातील बारीसुरगस च्या डोंगोफलीपाडा, चुलबारीपाडा, व निवडाजापाडा अशा तिघा पाड्याची लोकसंख्या ही सुमारे साडे चारशे ते पाचशे च्या दरम्यान आहे. या पाड्यांवरील नागरीकांना घरकुल व शेती साहीत्य डोक्यावर घेऊन जावे लागते तसेच रुग्णांना रुग्णालयात झोळीतुन न्यावे लागत असल्याने येथील ग्रामस्थांची मोठ्या



प्रमाणावर गैरसोय होत असल्याने येथील ग्रामस्थांनी मातीचा रस्ता तयार केला होता चार वर्ष उलटून देखील या रस्त्यावर संबंधित बांधकाम विभागाने खडीकरण व डांबरीकरण केले नसल्याने या चार किलोमीटर रस्त्याची मोठ्या प्रमाणावर दुरावस्था झाली परिणामी ग्रामस्थांची पुन्हा गैरसोय व्हायला लागल्याने अखेर या पाड्यांवरील नागरीकांनीच पुन्हा श्रमदानातून रस्त्याची दुरुस्ती केली यासाठी सायसिगं पाडवी, दाजला पाडवी, रायसिगं पाडवी, चमा-या पाडवी, भादया वसावे, पिसा वसावे, काकल्लीबाई पाडवी, दिपला पाडवी, रोमका वसावे, ज्योती पाडवी, मुगी वसावे, विलास वसावे, निशा वसावे, आनंद वसावे, मिना वसावे, वेस्ता वसावे, अतुल वसावे, रामली पाडवी, आशा पाडवी, मालु वसावे यांनी ग्रामस्थांना एकत्र करुन परिश्रम घेतले. तसेच शासनाने या रस्त्यावर तातडीने खडीकरण व डांबरीकरण करण्याची मागणी केली आहे.

## भव्य ग्रामीण तीन दिवसीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन आधुनिक तंत्रज्ञान समजून घेण्याची शेतकऱ्यांना संधी


दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील शिंजीर मिल्क ण्ड ग्रो प्रोडयुसर कंपनी केज यांच्या वतीने नोव्हेबर महिण्यात दि.७ ते ९ या कालावधीत कृषी प्रदर्शनाचे आयोजन विठाई मंगल कार्यालय, धारुर रोड केज येथे करण्यात आले आहे.तरी जिल्हयातील सर्व शेतकरी बांधव व्यवसायीक यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन कंपनीचे संचालक विशाल चौरे यांनी केले आहे.
या प्रदर्शनात महाराष्ट्र राज्यातील शेतीशी निगडीत आधुनिक तंत्रज्ञान, पाणीव्यवस्थापन, पिक व्यवस्थापन या क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्या सहभागी होणार आहेत.केज तालुक्यात पहिल्यांदाच या कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रा तील निगडीत आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी,यासाठी पश्चिम महाराष्ट्रात दरवर्षी विविध प्रदर्शने होतात.याच धर्ती वर केज मध्ये शिंजीर मिल्क ण्ड ग्रो प्रोडयुसर कंपनीने पुढाकार घेत या कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे.यामुळे केज तालुक्यातील तसेच बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान समजुन घेण्यासाठी संधी मिळणार आहे.या प्रदर्शनामध्ये प्रगत शेती
मशिनरी,आधुनिक साधने सुधारीत बीयाणे,खते, किटकनाशके,दुग्ध व्यवसाय या विषयी थेट प्रात्यक्षीके पाहण्यास मिळतील.हे प्रदर्शन शेतकरी,व्यापारी,विक्रेते, वैज्ञानिक,विदयार्थी यांच्या साठी एक व्यासपीठ म्हणुन उपलब्ध असणार आहे.यामुळे आपल्या जिल्हयातील तसेच मराठवाडयातील शेती तील व शेतीपुरक व्यवसायातील उत्पादना साठी निश्चीतच मदत होईल.तसेच मराठवाडया तील पारंपारीक शेतीचे देखावे हे या कृषी प्रदर्शनाचे खास आकर्षण असणार आहे. शेतकऱ्यांनी याप्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### आज पाली येथे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत होणाऱ्या
## शेतकरी संवाद दौऱ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे-माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

अलीकडील अतिवृष्टीमुळे संपूर्ण मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतातील पिके वाहून गेली, जनावरांचे हाल झाले, तर अनेक शेतकरी कर्जबाजारीपणाच्या विळख्यात सापडले आहेत.या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब हे माजी विरोधी पक्षनेते तथा बीड जिल्हा संपर्क नेते अंबादासजी दानवे यांच्या आयोजनाखाली
दिनांक ५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११:३० वाजता, बीड जिल्ह्यातील पाली येथे



शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधणार आहेत. या दौऱ्यात उद्धव ठाकरे अतिवृष्टीच्या तडाख्यात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या समस्या, नुकसान आणि शासकीय मदतीचा अभाव याबाबत थेट माहिती घेणार आहेत. तसेच राज्य सरकारने तातडीने मदतकार्य राबवावे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने जाहीर केलेली आर्थिक मदत लवकरात लवकर देण्यात यावी, यासाठी पुढाकार घेणार आहेत. या अनुषंगाने शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी बीड जिल्ह्यातील सर्व शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी बांधवांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## कडा बसस्थानकातील मुतारीचा वासाने प्रवाशांना उलटया होऊ लागल्या;आगार प्रमुख साहेब झोपी गेले का ?

दैनिक वादळ वार्ता
**आष्टी । प्रतिनिधी**

मराठवाड्याचे प्रवेश द्वार असलेले व बीड-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील कायम वर्दळीचे असणाऱ्या कडा बसस्थानकात महिला,पुरूषासाठी स्वच्छतागृह उभारले आहे.पण याची वेळोवेळी स्वच्छता होत नसल्यान बसस्थानक परिसरात याच दुर्गंधीचा वासाने प्रवाशांना उलटया होऊ लागल्या आहेत. हे होत असताना यावर उपाययोजना करण्यासाठी आगार प्रमुख लक्ष देत नाहीत.ते काय झोपा काढतात की काय? उपस्थित होत आहे. आष्टी तालुक्यातील कडा येथे बसस्थानक असून मध्यवर्ती असल्याने व लांब पल्ल्याच्या बस धावतात.येथील बसस्थानकात प्रवाशासाठी स्वच्छतागृह आहे.पण या ठिकाणच्या स्वच्छतागृहाची कसलीच स्वच्छता होत नसल्याने बसस्थानकासह परिसरात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधीचा वास येत आहे.यामुळे इथे येताना आणि जाताना नाकाला रूमाल लावून बसावे लागते. एवढे सगळे होत असताना देखील आगार प्रमुखाचे याकडे दुर्लक्ष आहे.त्याना झोप लागली की काय?असा प्रश्न होत आहे.आगार प्रमुखांनी याकडे लक्ष देऊन त्वरीत यावर उपाययोजना करावी अशी मागणी होत आहे.



संपादकीय

# दक्षिण महाराष्ट्रात सोयीचे राजकारण जोरावर

दक्षिण महाराष्ट्रातील राजकीय वातावरण सध्या चांगलेच ढगाळ झाले आहे. कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांमध्ये पक्षांतर्गत वाद, छुप्या युती यामुळे राजकीय समीकरणे सतत बदलत आहेत. कधीकाळी एकत्र लढणाऱ्या नेत्यांमधील दुरावा, तर काही ठिकाणी राजकीय सोयीसाठी नवीन जोड्या तयार होत आहेत. राजकीय अस्थिरतेचे दर्शन घडवत आहेत.कोल्हापूरमध्ये काँग्रेसचे आमदार सतेज पाटील आणि महायुतीचे आमदार राजेश क्षीरसागर यांच्यातील वाक्युद्ध पुन्हा तीव्र झाले आहे. कधीकाळी परस्परपूरक राजकारण करणारे हे दोन नेते आता शक्तिपीठ महामार्ग आणि स्थानिक विकासाच्या मुद्द्यांवरून आमने-सामने आले आहेत. ३० ऑक्टोबरला सतेज पाटील यांनी क्षीरसागर यांच्यावर मुंबईत झालेल्या महामार्ग समर्थक बैठकीतील शेतकऱ्यांच्या जमिनींबाबत सवाल उपस्थित केला, तर क्षीरसागर यांनी पाटील यांच्यावर जिल्ह्याच्या विकासाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला. या वादाने कोल्हापूर उत्तर मतदारसंघातील राजकीय तापमान वाढले असून, येत्या महापालिका निवडणुकीत याचा परिणाम दिसण्याची शक्यता आहे.

**काका-पुतण्याच्या पक्षाची अनोखी आघाडी**

चंदगडमध्ये मात्र राजकीय सोयीने नवीन वळण घेतले आहे. ज्याची राज्यभर चर्चा व्हावी असे हे उदाहरण आहे. विधानसभा निवडणुकीत पराभूत झालेल्या राष्ट्रवादी (शरद पवार गट)च्या नंदाताई बाभूळकर-पाटील यांनी राजकीय पुनरागमनासाठी महायुतीतील अजित पवार राष्ट्रवादीबरोबर जवळीक साधली. २८ ऑक्टोबरला वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी यासाठी पुढाकार घेत बाभूळकर पाटील आणि त्यांच्या विधानसभेला पराभूत मंडळींना एकत्र आणले. यामुळे सावध होत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दोघांचे विरोधक अप्पी पाटील यांना भाजपमध्ये सामावून घेण्याची घोषणा केली. अप्पी पाटील हे सतेज पाटील गटाचे प्रमुख समर्थक म्हणून ओळखले जातात, त्यामुळे हा प्रवेश काँग्रेसला मोठा धक्का ठरला म्हणावा की काँग्रेस आणि भाजपच्या पाटलांनी एकत्र येऊन नवा डाव टाकला म्हणावा हा प्रश्न आहे. हसन मुश्रीफ यांच्या भूमिकेमुळे राष्ट्रवादी (अजित पवार गट) आणि भाजपमधील वाद उघडपणे दिसू लागला आहे. तिथे अजून बरेच राजकारण शिजायची शक्यता आहे. १२ तालुक्यात १२ प्रकार दिसतील!

**सांगलीत गाडगीळ यांचे चंद्रकांतदादांनाआव्हान**

सांगलीत भाजपचे आमदार सुधीर गाडगीळ यांनी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या राजकारणाला आव्हान देणारा लेटर बॉम्ब नुकताच टाकला. काँग्रेसमधून आलेल्या जयश्री मदन पाटील यांच्या गटाचे ६ नगरसेवक भाजपमध्ये आले असताना २२ जागा त्यांच्या गटाला देण्याला आपला विरोध गाडगीळ यांनी पत्रक काढून दर्शवला. त्याला माजी मंत्री सुरेश खाडे यांनीही साथ दिली. त्यामुळे पालकमंत्री पाटील गडबडले आणि सारवासारव केली. पक्ष आपल्यापद्धतीने पुढे नेण्याचा त्यांचा मनसुबा उधळला गेला. या बंडामागे काँग्रेसमधील विशाल पाटील यांची फूस असल्याची भाजपमध्ये चर्चा सुरू झाली आहे. त्यांनी राष्ट्रवादीचे जयंत पाटील यांनाही स्थानिक स्वराज्य निवडणुकीत जायबंदी करून ठेवले असून दोन आजीमाजी पालकमंत्र्यांची सांगली जिल्ह्यात चांगलीच गोची झाली आहे.

**जयंत पाटील-विशाल पाटलांमध्ये जुंपले**

पुणे पदवीधर मतदारसंघातून सांगलीच्या राष्ट्रवादी सोडलेल्या शरद लाड यांची उमेदवारी चंद्रकांत पाटील यांनी परस्पर घोषित केली. त्याआधी कोल्हापुरातून हसन मुश्रीफ यांनी अजित पवार गटाकडून परस्पर उमेदवार जाहीर केला होता. मुश्रीफ म्हणतात, तिथे आमच्या पक्षाचा आमदार निवडून आला होता. त्यांच्या मुलाला पक्षात घेतले म्हणून उमेदवारी घोषित करायचा अधिकार चंद्रकांत पाटील यांना नाही. काय ते देवेंद्र फडणवीस ठरवतील. आपण त्यांच्याशी बोलू. महायुतीत हा वाद उफाळला. त्याचवेळी सांगलीत काँग्रेस जयंत पाटील यांच्यासोबत जायला तयार नाही. ही द्विधा अवस्था पाहता जयंत पाटील यांनी इस्लामपूर नगराध्यक्षपदासाठी राष्ट्रवादी (शरद पवार गट)चा उमेदवार परस्पर जाहीर केला. ३१ ऑक्टोबरला जयंत पाटील यांनी आनंदराव मुलगुंडे यांची उमेदवारी घोषित करत म्हटले, 'महाविकास आघाडीच्या घटकांसोबत चर्चा सुरू आहे, पण तुतारी चिन्हावर लढणार.' तिथल्या काँग्रेसनेही उमेदवार देण्याची घोषणा केली. या घटनेमुळे सांगलीतील आघाडीचे समीकरण कोलमडण्याची शक्यता आहे. त्यामुळे भाजपचे माजी खासदार संजय पाटील यांना सोबत घेऊन आघाडी करायची जयंत पाटील यांनी तयारी चालवली असून त्याला आर. आर. पाटील यांचे पुत्र आ. रोहित पाटील विरोध करत आहेत. त्यांना शिंदे शिवसेनेचे आमदार सुहास अनिल बाबर यांची साथ असल्याने तासगाव, कवठे महांकाळ, खानापूर आणि आटपाडी या चार तालुक्यात विचित्र आघाड्या लढताना दिसतील. भाजपने पुन्हा सामावून घ्यावे म्हणून संजय पाटील उपोषण, चक्का जाम असा दबाव वाढवत असून त्यांना न घेऊन होणाऱ्या नुकसानीच्या भीतीने चंद्रकांत पाटीलदेखील गडबडले आहेत. महापालिकेला पक्षाचे दोन आमदार विरोधात आणि जिल्हा परिषदेला जयंत पाटील यांच्या सोबत पक्षाचे माजी खासदार जोडले गेले, तर आपण कोणाशी हात मिळवणी करायची की विशाल पाटील, विश्वजित कदम यांच्याशी अंडर स्टॅन्डिंग करून लढायचे आणि तसे लढले, तर आपल्या सत्तेचे महत्त्व काय राहणार? हा प्रश्न मंत्री चंद्रकांत पाटील यांना चक्रावून सोडत आहे.

**दक्षिण महाराष्ट्रात ठाकरे सेना गपगार!**

सातारा जिल्ह्यात फलटणच्या डॉ. संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणाने राजकीय वाद भडकला आहे. भाजपचे माजी खासदार संजीवराजे निंबाळकर यांचा गट अडचणीत सापडला असताना, ठाकरे सेनेचे संपर्क प्रमुख नितीन बानुगडे पाटील यांनी चिडीचूप बसण्याची भूमिका घेतली आहे. हे माहीत झाल्यामुळे पक्षाने सुषमा अंधारे यांना बदलीवर पाठवून २९ ऑक्टोबरला पत्रकार परिषद घ्यायला लावली.अंधारे यांनी माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांच्यावर गंभीर आरोप करत एसआयटी चौकशीची मागणी केली. डॉ. मुंडे यांच्या आत्महत्येत निंबाळकरांचा हात असल्याचा दावा करत अंधारे यांनी सुसाईड नोटमधील विसंगती दाखवली. संजीवराजे निंबाळकर गटाने बचाव केला असला तरी त्यांची लढत मित्रपक्षाबरोबर सुरू आहे. पण, नितीन बानुगडे पाटील यांच्या मौनाने ठाकरे सेनेत पक्षांतर्गत तणाव वाढला. राज्य सरकारने एसआयटी गठित केली असली तरी हा वाद निवडणुकांसाठी राजकीय हत्यार बनू शकतो. पण यानिमित्ताने ठाकरे सेना दक्षिण महाराष्ट्रात निपचित पडल्याचे स्पष्ट झाले आहे. कोल्हापुरात अरुण दुधवडकर आणि सांगली सातारा जिल्ह्यात बानुगडे पाटील हे दोन संपर्क प्रमुख स्वपक्षातील पदाधिकारी आणि इतरांचे खच्चीकरण करण्यात वेळ घालवत असून जिल्हा पदाधिकारी किरकोळ आंदोलने करून निवडणुकीच्या राजकारणापासूनच दूर गेले आहेत. गपगार पडलेला पक्ष आणि नगण्य अवस्था झाल्याने या सगळ्या घडामोडीत हा पक्ष कुठेच नाही. पदवीधर निवडणुकीत सतेज पाटील परिवारात तिकीट दिले, तर विरोध करून आपले उखळ पांढरे करून घ्यायचे यासाठीची रणनीती सध्या ठाकरे सेनेतील मंडळी आखत आहेत! हेच काय ते त्यांचे राजकारण !

# क्रीडा क्षेत्रातील तेजोदीप प्रा.विनोद गुंड पाटील

## केज तालुक्यात क्रीडा संस्कृतीला नवी दिशा देणारे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व

क्रीडा ही फक्त स्पर्धा नसून व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी साधन आहे, हे स्वतःच्या कृतीतून, सातत्यातून आणि सकारात्मक दृष्टीकोनातून सिद्ध करून दाखवणारे नाव म्हणजे प्रा विनोद चंद्रकांत गुंड पाटील. विजय स्पोर्ट्स अकादमीचे संस्थापक व संचालक, केज तालुका क्रीडा संयोजक, तसेच स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये क्रीडा शिक्षक या अनेक भूमिकांतून त्यांनी केज तालुक्यातील क्रीडा क्षेत्राला दिशा आणि गती दिली आहे.

**विद्यार्थी दशेतच क्रीडाप्रेम जोपासले**

चंपावती विद्यालयात प्राथमिक शिक्षण घेताना क्रीडा प्रेमाची बीजे रुजली. बलभीम महाविद्यालय, बीड येथून पदवी आणि छत्रपती संभाजीनगर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून एमए, एमपीएड पूर्ण करत त्यांनी क्रीडा क्षेत्रातील शैक्षणिक भक्कम पाया रचला. फुटबॉल, क्रिकेट आणि बास्केटबॉल या तीनही खेळांत त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. फुटबॉलमध्ये राज्य सराव शिबिरात सहभाग, जिल्ह्याचे प्रतिनिधित्व आणि राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये खेळण्याचा मान मिळवला. बास्केटबॉलमध्ये तर त्यांनी बीड जिल्हा संघाचे नेतृत्व करत महाराष्ट्र राज्य स्पर्धेत चमकदार कामगिरी केली.

**क्रीडा क्षेत्रातील सेवा गाथा**

क्रीडा संयोजक म्हणून तालुक्यातील क्रीडा संस्कृती बळकट करण्याचे ध्येय त्यांनी हृदयाशी बाळगले. तालुक्यात मूळभूत क्रीडा सुविधा नसतानाही हार न मानता त्यांनी विजय स्पोर्ट्स अकॅडमी स्थापन केली. ही अकॅडमी आज अनेक विद्यार्थ्यांसाठी भविष्य घडवणारे 'क्रीडा गुरुकुल' बनली आहे.

**महत्त्वपूर्ण उपक्रम**

प्रशिक्षण शिबिर : योगा, बुद्धिबळ, फुटबॉल, क्रिकेट, खो-खो, बास्केटबॉल यांसारख्या विविध खेळांचे नियमित प्रशिक्षण

**स्पर्धांचे आयोजन**

क्रिकेट, बुद्धिबळ, तायक्कांदो, खो-खो इत्यादींचे प्रतिवर्षी भव्य आयोजन

**प्रेरणादायी मार्गदर्शन**

शालेय, तालुका, जिल्हा, विभाग, राज्य आणि राष्ट्रीय स्पर्धांमध्ये खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध



विनोद गुंड यांना प्रा सुनील धांडे, प्रा जे पी शेळके, अनिल जगताप, उत्तम चक्रे, अशोक आघाव व प्रा जमीर सर यांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळाला. बीड जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर व श्री चव्हाण यांनी वेळोवेळी साथ दिली.

**सन्मान आणि गौरव**

२९ ऑगस्ट २०२५ - राष्ट्रीय क्रीडा दिन या दिवशी बीडचे जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच बीड जिल्हा खासदार श्री बजरंगबप्पा सोनवणे व आमदार नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या हस्तेही उत्कृष्ट क्रीडा संघटक व प्रशिक्षक म्हणून त्यांचा सत्कार झाला-हा क्रीडा क्षेत्रातील कार्याचा गौरवच.

**भविष्यातील ध्येय**

केज तालुक्यातील प्रत्येक खेळाडूला योग्य प्रशिक्षण, संधी आणि व्यासपीठ मिळाले पाहिजे. शालेय ते राष्ट्रीय स्तरापर्यंत खेळाडूंना घडवणे हे माझे ध्येय आहे, अशी भूमिका प्रा. विनोद गुंड पाटील व्यक्त करतात. केज तालुक्यातील शेकडो विद्यार्थ्यांच्या जीवनात क्रीडा मार्फत शिस्त, आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि राष्ट्रीयतेची भावना निर्माण करण्याचे काम ते सातत्याने करत आहेत. समाजासाठी क्रीडा क्षेत्रातले त्यांचे योगदान म्हणजे एक प्रेरणादायी आदर्श आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त विजय स्पोर्ट्स अकादमी परिवारासह क्रीडा विश्वातील असंख्य खेळाडू, प्रशिक्षक, पालक आणि क्रीडाप्रेमी त्यांच्या कार्याचा गौरव करत आहेत.

# भारतीय महिलांनी दाखवलं : स्वप्नं जर मनापासून पाहिली,तर सीमा काहीच नाहीत




हॉलीवूडच्या झगमगाटात भारतीय लेकींचं तेज झळकलेलं पाहून प्रत्येक भारतीयाचं हृदय अभिमानाने भरून आलं. ज्या स्वप्नांची पायवाट कधी फक्त स्वप्ननगरीपर्यंत सीमित होती, ती आज वास्तवात उतरताना दिसते आहे. कला, परिश्रम आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर भारताच्या लेकींनी 'जग जिंकलं' आणि साकार केलं ते अधुरं स्वप्न, जे आज प्रत्येक भारतीय डोळ्यात चमकतं आहे. झगमगत्या मंचावर जेव्हा भारतीय महिलांच्या क्रिकेट संघाने विजयी जल्लोष साजरा केला, तेव्हा संपूर्ण भारताने श्वास रोखून तो क्षण अनुभवला. कधी केवळ पुरुषप्रधान खेळ मानला जाणारा क्रिकेट आज स्त्रियांच्या घामाने, संघर्षाने आणि आत्मविश्वासाने नव्या अर्थाने उजळला आहे.

ही केवळ विजयी धाव नव्हती तर ती होती अनेक दशकांच्या मेहनतीची, समाजाच्या शंकेची आणि स्वतःवरच्या न संपणाऱ्या विश्वासाची फळं. 'भारताच्या लेकींनी जग जिंकलं' हे वाक्य आता फक्त एक शीर्षक राहिलेलं नाही, तर ते एक घोषणा बनलं आहे. भारतीय स्त्रीशक्तीच्या अमर पराक्रमाची! मिथक तोडणाऱ्या या खेळाडूंनी दाखवलं की, कसोटी मैदानावर असो की जीवनात, धैर्य आणि चिकाटीचं बॅटिंग केलं तर कोणतीही डावसंख्या जिंकता येते. जेमिमाह रॉड्रिग्स, हरमनप्रीत कौर, स्मृती मंधाना आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केवळ ट्रॉफीच नाही जिंकली, तर असंख्य मुलींची स्वप्नं साकार केली. जगभरात भारताचं नाव उजळवणाऱ्या या लेकी अभिमान, प्रेरणा आणि संघर्षाचं प्रतीक. वर्ल्ड कप स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड महिला संघाशिवाय वर्ल्ड कपची फायनल रंगल्याचे पाहायला मिळाले. भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यातील फायनलसह २५ वर्षानंतर नवा वर्ल्ड चॅम्पियन मिळणार हे आधीच ठरलं होतं. अखेर तिसऱ्या प्रयत्नात भारतीय महिला संघाने वर्ल्ड कप ट्रॉफीचं स्वप्न साकार केले.नवी मुंबईतील डी.वाय. पाटील स्टेडियमवर रंगलेल्या महिला विश्वचषकातील अंतिम सामन्यात भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेला पराभूत करत पहिली वहिली विश्वचषक स्पर्धा जिंकत इतिहास रचला आहे. शफाली वर्माच्यासह दीप्ती शर्माच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर भारतीय संघाने २९९ धावांचा बचाव करत शेवटी बाजी मारली. २००५ आणि २०१७ मध्ये अधुरं राहिलेल स्वप्न हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघानं स्वप्ननगरीत साकार करून दाखवलं. भारतीय संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिका संघाची कर्णधार लॉरा वॉल्व्हार्ड हिने शतकी खेळी केली. तिने भारतीय संघाचं टेन्शन वाढवलं होते, पण दीप्तीच्या गोलंदाजीवर तिने मोठा फटका खेळला अन् अमनजोत कौरनं तिसऱ्या प्रयत्नात कॅच पूर्ण करत तिसऱ्या प्रयत्नात ट्रॉफी जिंकण्याचा मार्ग मोकळा केला. दक्षिण आफ्रिकेला हरवून महिला टीम इंडिया अजिंक्य झाली आणि शेवटी भारताच्या लेकींनी 'जग जिंकलं' स्वप्ननगरीत अधुरं स्वप्न केले साकार!



प्रविण बागडे
नागपूर
९९२३६२०९१९

२००७ साली प्रदर्शित झालेल्या चक दे! इंडिया या चित्रपटात शाहरुख खाननं साकारलेला कोच कबीर खान हा पात्र खऱ्या आयुष्यातल्या एका घटनेवर आधारित होता. या पात्रामागे प्रेरणा होती मीर रंजन नेगी. भारतीय हॉकीचा माजी गोलकीपर. १९८२ च्या आशियाई स्पर्धेत भारताला पाकिस्तानकडून १-७ असा पराभव पत्करावा लागला होता. त्यावेळी नेगींवर देशद्रोहाचे आरोप झाले, माध्यमांनी आणि जनतेने त्यांच्यावर तीव्र टीका केली. त्यांच्या आयुष्यावर काळोख पसरला. काही वर्षांनी त्यांनी महिला हॉकी संघाच्या प्रशिक्षकपदी जबाबदारी घेतली. त्यांचं काम, समर्पण आणि विश्वास यांच्या जोरावर भारताच्या महिला हॉकी संघाने २००२ च्या कॉमनवेल्थ गेम्समध्ये सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला! याच वास्तवातून चक दे! इंडियाची कथा जन्माला आली. चित्रपटात कबीर खानवर 'देशद्रोही' ठरवण्यात येतो, पण शेवटी तो भारताला जिंकवून आपली ओळख पुनःप्रस्थापित करतो. हेच मीर रंजन नेगींच्या जीवनाचं प्रतिबिंब होतं. त्यावर शाहरुख खान म्हणाला होता हा चित्रपट फक्त हॉकीबद्दल नाही; तो 'सेकंड चान्स' मिळाल्यावर काय करता येतं, हे सांगतो. चक दे! इंडियानं फक्त एक खेळ दाखवला नाही तर त्याने शिकवलं की, अपयशावर मात करून, समाजाच्या शंकेला उत्तर देत, मेहनत आणि एकतेनं देशाचं नाव पुन्हा उजळवता येतं.

भारतीय महिला संघाने टॉस गमावल्यावर पहिल्यांदा फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकात २९८ धावा करत दक्षिण आफ्रिकेच्या संघासमोर २९९ धावांचे टार्गेट सेट केले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वॉल्व्हार्ड हिने सेमी फायनलनंतर फायनलमध्येही शतक करत वर्ल्ड रेकॉर्ड रचला. वर्ल्ड कपच्या एका हंगामात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम तिने आपल्या नावे केला. पण शेवटी भारतीय संघाने फायनल बाजी मारत अधुरं स्वप्न साकार केलं. भारतीय महिलांच्या या विजयानं समाजातील जुनी विचारसरणी डळमळवली आहे. आता क्रिकेट हे 'पुरुषांचं खेळणं' नाही, तर प्रत्येक भारतीय मुलीच्या आत्मविश्वासाचं प्रतीक आहे. आज या विजयानं शाळा, गल्ल्या आणि मैदानं नव्या आवाजाने गाजत आहेत. मी सुद्धा खेळेन, मी सुद्धा जिंकेन! हा विजय फक्त खेळाचा नाही तर तो आहे समानतेचा, संघर्षाचा आणि ओळख निर्माण करण्याचा विजय. स्वप्ननगरीत जे कधी अधुरं वाटत होतं, ते आज या भारताच्या लेकींनी पूर्णत्वास नेलं.

# ह.भ.प.जनाई महाराज कोकाटे यांचे १६ नोव्हेंबरला घाटनांदुर येथे कीर्तन

## कै.जाईबाई शंकरराव साळुंके यांच्या वर्षश्राद्धानिमित्त कार्यक्रम

दैनिक वादळ वार्ता
घाटनादूर । प्रतिनिधी

आई म्हणजे घराचे तेज, मायेची सावली आणि प्रेरणेचा झरा. त्या प्रेमळ मायेच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी कै. जाईबाई शंकरराव साळुंके यांच्या वर्षश्राद्धाचा कार्यक्रम रविवार, दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी साळुंके परिवाराच्या वतीने श्रद्धाभावाने आयोजित करण्यात आला आहे.

या प्रसंगी सुप्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प. जनाई महाराज कोकाटे (संगमकर) यांचे कीर्तन सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत संपन्न होणार आहे. त्यांच्या ओजस्वी वाणीमधून श्रद्धा, भक्ती आणि मातृप्रेम यांचे दर्शन घडणार असून, गावातील तसेच परिसरातील भाविकांना या कीर्तनाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कीर्तनानंतर सर्व उपस्थितांसाठी भोजन प्रसादाची व्यवस्था दुपारी १ ते ५ वाजेपर्यंत ठेवण्यात आली आहे. कार्यक्रमाचे ठिकाण बी.एस.एन.एल. टॉवरजवळील साळुंके कुटुंबाचे राहते घर, घाटनादूर असे आहे. कै. जाईबाई साळुंके या आपल्या आयुष्यात स्नेह, सहकार्य आणि ममतेचे प्रतीक होत्या. त्यांच्या संस्कारांचा वारसा आज साळुंके कुटुंबात जिवंत आहे. आईच्या प्रेमळ आठवणींना अर्पण म्हणून हा श्रद्धांजली सोहळा भावपूर्ण वातावरणात पार पडणार आहे.

या कार्यक्रमास भाविक भक्तांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक श्री. सुरेश शंकरराव साळुंके, श्री. संजय शंकरराव साळुंके, चि. शंकर (सतीश) रमेश साळुंके व चि. अभिजीत वैजनाथ साळुंके ह्यांनी सर्व नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थ आणि भाविक बांधवांना या भक्तिमय कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे, कीर्तन श्रवण व भोजन प्रसादाचा लाभ घेण्याचे विनम्र आवाहन केले आहे.



# संत नामदेव महाराजांनी आपल्या कार्यातून समाजाला दिशा दिली

दैनिक वादळ वार्ता । अहिल्यानगर । प्रतिनिधी

भगवंत नामाने जीवनातील दु:ख कमी होऊन आनंद निर्माण होत असतो. हेच संतांनी मनुष्याचे जीवन सुखी-समृद्ध होण्यासाठी आपल्या सत्वचनातून मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या वचनांप्रमाणे मनुष्याने वाटचाल केल्यास कोणत्याही प्रकारच्या अडचणी येत नाही. संत नामदेव महाराजांनी कार्यातून समाजाला दिशा देण्याचे काम केले आहे.नामदेव शिंपी समाज ट्रस्टच्यावतीने सावेडी परिसरातील या मंदिरात विविध कार्यक्रमातून धार्मिक वातावरण निर्माण होत आहे. त्याचबरोबरच समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहेत, धार्मिक कार्यातून समाजाचे मोठे संघटन उभे राहत आहे. असे प्रतिपादन ट्रस्टच्या अध्यक्षा प्रमिला दुमाटे यांनी केले.श्री संत नामदेव महाराज यांच्या जयंती निमित्त शोभायात्रा काढण्यात आली होती यावेळी ट्रस्टच्या प्रमिला दुमाटे ,उपाध्यक्ष दिलीप काकडे ,सचिव राजू बगाडे ,खजिनदार कृष्णा भस्मे ,सुरेश लोळगे ,श्रीकांत बुलबुले ,महेश चकटे ,विजय काकडे ,सुधीर काकडे ,निलेश चोकटे आदी उपस्थित होते . ट्रस्टच्या अध्यक्षा प्रमिला दुमाटे पुढे म्हणाल्या कि संत नामदेव महाराज यांनी जगाच्या कल्याणासाठी आपले आयुष्य वेचले. त्यांनी सामान्यांसाठी केलेले कार्य अनमोल व महान आहे. त्यांच्या कार्याचा वारसा असाच पुढे चालू राहिला पाहिजे. याच उद्देशाने श्री संत नामदेव महाराज शिंपी समाज ट्रस्टच्या माध्यमातून शिंदे मळा येथे भव्य मंदिर उभारण्यात आले असून, त्या ठिकाणी विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते.

# भोजापूर प्रकल्पाचा समावेश नदीजोड प्रकल्पात करण्या साठी आराखडा-पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील

## ११ वंचित गावांसाठी सर्वेक्षणाचे आदेश



दैनिक वादळ वार्ता । शिर्डी । प्रतिनिधी

भोजापूर प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातून वंचित राहिलेल्या ११ गावांना पाण्याचा लाभ मिळवून देण्यासाठी तातडीने सर्वेक्षण करण्याचे आदेश संबंधित अधिकार्यांना देण्यात आले आहेत. भोजापूर प्रकल्पाचा समावेश नदीजोड प्रकल्पात करून अतिरिक्त पाणी निर्माण करण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला असून, जिरायती भागात सिंचनक्षेत्र निर्मितीसाठी शासनामार्फत आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे, अशी ग्वाही जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

भोजापूर डावा कालवा व पूरचाऱ्याच्या सुमारे ४४ कोटी रुपयांच्या कामांचा शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार अमोल खताळ, अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, जलसंधारण विभागाचे हरीभाऊ गीते, कार्यकारी अभियंता मोनज ढोकचौळे, तहसीलदार धीरज मांजरे, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे आदी अधिकारी उपस्थित होते.पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, चाळीस वर्षांपासून प्रलंबित असलेले काम शासनाने एका वर्षात पूर्णत्वास नेले. निवडणुकीपूर्वी भोजापूरचे पाणी देण्याचा शब्द दिला होता आणि तो शासनाने पूर्ण केला. यापूर्वीप्रमाणे टँकरने पाणी आणण्याची वेळ आली नाही, तसेच शेतकऱ्यांना त्रास न होता निळवंडे आणि भोजापूर धरणांतून पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. यंदा पावसाचे प्रमाण चांगले असल्याने लाभक्षेत्रातील गावांना पाणीपुरवठा शक्य झाला.या भागातील सोनेवाडी, पिंपळे, सोनोशी, नान्नज, दुमाला, काकडवाडी, पारेगाव खुर्द, पारेगाव बुद्रुक आदी ११ गावे निळवंडे व भोजापूर प्रकल्पाच्या पाण्यापासून वंचित राहिली होती. या गावांना पाणीपुरवठा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच काही गावांच्या मागणीनुसार उपसा सिंचन योजना राबवून पाणीपुरवठा करता येईल का, यासाठी अधिकार्यांना सर्वेक्षण करण्याच्या सूचनादेखील देण्यात आल्या आहेत.भोजापूर प्रकल्पाचा समावेश दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्पामध्ये करण्यात आला असून, या प्रकल्पासाठी १२ ते १३ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे. महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याचा शासनाचा संकल्प असून, स्व. बाळासाहेब विखे पाटील व गणपतराव देशमुख यांनी पाहिलेले स्वप्न पूर्णत्वास नेण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे मंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

आमदार अमोल खताळ म्हणाले, पूर्वी निवडणुकीच्या काळातच भोजापूर चारीची चर्चा व्हायची; मात्र आता शासनाच्या प्रयत्नांमुळे या भागाला प्रत्यक्ष पाण्याचा दिलासा मिळाला आहे. चारीची कामे केवळ औपचारिक राहिली होती, ती प्रत्यक्षात आणण्याचे काम शासनाने केले. चाळीस वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रकल्प केवळ एका वर्षात कार्यान्वित झाला. साकूर पठार भागातील पाण्याचा प्रश्नही उपसा सिंचन योजनेद्वारे सोडविला जाणार आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी अभियंता सोनल शहाणे यांनी केले. कार्यक्रमास किसनराव चतर, सुदामराव सानम, भीमराज चतर, श्रीकांत गोमासे, हरीश चकोर, संदीप देशमुख, विठ्ठलराव घोरपडे, राजेंद्र सोनवणे तसेच लाभक्षेत्रातील शेतकरी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# गुलमोहर रोडवरील गतीरोधक व पथदिवे बसवण्याची मागणी

दैनिक वादळ वार्ता

अहिल्यानगर । प्रतिनिधी



शहरातील गुलमोहर रोड हा वाहतुकीचा गजबजलेला व नागरिकांच्या दैनंदिन प्रवासातील एक महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र, या रस्त्यावर पथदिवे व गतीरोधक नसल्याने सतत अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. या गंभीर प्रश्नावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी भाजप युवा मोर्चाचे शहर जिल्हा सरचिटणीस आकाश सोनवणे यांनी केली असून, त्यांनी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन निवेदन दिले. गुलमोहर रोड हा शहरातील सर्वाधिक रहदारी असलेला मार्ग असून, या परिसरात व्यापारी, शैक्षणिक संस्था व निवासी वसाहती मोठ्या प्रमाणावर आहेत. रात्रीच्या वेळी पथदिवे नसल्याने संपूर्ण परिसर अंधारमय होतो. त्यामुळे महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि कार्यालयातून घरी परतणारे प्रवासी यांना जिव धोक्यात घालून प्रवास करावा लागतो.गतीरोधक नसल्यामुळे वाहने सुसाट वेगाने धावत असतात, परिणामी लहान-मोठे अपघात वारंवार घडत आहेत. प्रशासनाने योग्य उपाययोजना न केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. गुलमोहर रोडवर विशेषतः पोलीस चौकीसमोर आणि गरजेच्या ठिकाणी पथदिवे तातडीने बसवावेत, मानांकनानुसार गतीरोधक बसवावेत व त्यावर पांढऱ्या पट्ट्यांचे रंगकाम करून ते स्पष्ट देखील अशी व्यवस्था करावी. या उपायोजनामुळे पदचारी व नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित होईल तसेच वाहतूक शिस्तबद्ध होणार असल्याने यासंदर्भात तातडीने कारवाई करण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे

# अचलपूर उपविभागात तीन वर्षांपासून एकाच अधिकाऱ्याचा प्रभारी कारभार

दैनिक वादळ वार्ता

अमरावती । प्रतिनिधी



अचलपूर येथील जिल्हा परिषद बांधकाम उपविभागात गेल्या तीन वर्षांपासून एकाच अधिकाऱ्याचा प्रभारी म्हणून कार्यभार कायम ठेवण्यात आला असून, शासनाच्या नियमांचे उल्लंघन झाल्याची चर्चा सुरू आहे.

शासनाच्या मार्गदर्शक नियमांनुसार (फंडामेंटल रुल ४९ - एफआर-४९) प्रभारी अधिकारीचा कार्यकाळ कमाल तीन महिने असावा. मात्र, शाखा अभियंता नितीन झगडे यांना सलग तिसऱ्या वर्षीही अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली आहे. या संदर्भात जिल्हा परिषद कार्यालयाकडे विचारणा करण्यात आली असता उडवा-उडवीची उत्तरे दिल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणाबाबत नागरिक आणि जनप्रतिनिधींनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा यांच्याकडे तक्रार केली होती. तथापि, अद्याप कोणतीही कारवाई न झाल्याने प्रशासनावर पक्षपाताचे आरोप होत आहेत. सीईओ मोहपात्रा यांनी या संदर्भात म्हटले की, हे फार छोटे प्रकरण आहे. जर नियमानुसार कारवाईची गरज असती, तर ती मी केली असती.

दरम्यान, कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड यांनी सांगितले की, सक्षम अधिकाऱ्यांची यादी आणि सर्व कागदपत्रे सीईओकडे सुपूर्द केली असून पुढील निर्णय त्यांचाच आहे. दर्यापूर, मोर्शी आणि अमरावती उपविभागात नियमित डिप्टी इंजिनियर कार्यरत असताना अचलपूरमध्येच प्रभारी व्यवस्था कायम ठेवण्यात आल्याने शंका व्यक्त केली जात आहे.भाजप प्रदेशाध्यक्ष व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पूर्वीच तक्रारींवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. तरीदेखील झगडे यांच्या प्रकरणात अद्याप निर्णय न झाल्याने जिल्हा परिषद प्रशासनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# सरदार वल्लभाई पटेल यांची जयंती वृक्षारोपणाने साजरी

दैनिक वादळ वार्ता

अहिल्यानगर । प्रतिनिधी



वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनाची मोहिम चालविणाऱ्या जय हिंद फाउंडेशनच्या वतीने कोल्हार (ता. पाथर्डी) येथे सरदार वल्लभाई पटेल यांची जयंती वृक्षारोपणाने साजरी करण्यात आली. दुर्मिळ वृक्ष असलेले गोरख चिंच व राज्य पुष्प असलेले ताम्हण झाडांच्या रोपांची लागवड करण्यात आली.

कोल्हार येथील जिल्हा परिषद शाळा परिसरात सरदार पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पणाने अभिवादन करून विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सन फार्मा कंपनीचे सीएसआर हेड सोमनाथ दडस, निवृत्त मुख्याध्यापक महादेव पालवे गुरुजी, सरपंच राजू नेटके, उपसरपंच गोरक्ष पालवे, ग्रामपंचायत सदस्य ईश्वर पालवे, किशोर पालवे, शिवाजी पालवे, तसेच मुख्याध्यापक राजेंद्र दुसंगे उपस्थित होते. तसेच जय हिंद फाउंडेशनचे शिवाजी पालवे, धर्मनाथ पालवे, गोकुळ पालवे, संपत पालवे, अनुप पालवे, सिद्धार्थ पालवे, कार्तिक नेटके, कृषी अधिकारी मिनीनाथ बेल्हेकर आणि शालेय शिक्षक बजरंग बांदल, जयश्री भापकर, सुरेश कोळगे, सुजाता वाळूंज, वैशाली कदम यांची विशेष उपस्थिती होती.

शिवाजी पालवे म्हणाले की, भारत देशाला एकसंघ ठेवण्यासाठी आणि प्रगतीच्या मार्गावर नेण्यासाठी सरदार वल्लभाई पटेल यांनी अपूर्व योगदान दिले. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत आजच्या पिढीने देशप्रेम आणि पर्यावरणसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारणे गरजेचे आहे. गोरख चिंच हे झाड औषधी गुणधर्मांनी समृद्ध व अतिशय दुर्मिळ आहे, तर ताम्हणचे झाड महाराष्ट्राचे राज्य पुष्प असून आपल्या सांस्कृतिक वारशाचा एक अविभाज्य भाग आहे. विद्यार्थ्यांना या झाडांची माहिती मिळावी म्हणून जय हिंद फाउंडेशनतर्फे जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये ताम्हण आणि गोरख चिंच वृक्ष लागवड मोहिमा राबवल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले.

सोमनाथ दडस यांनी जय हिंद फाउंडेशनच्या पर्यावरण संवर्धन उपक्रमाचे कौतुक करत सांगितले की, संघटनेने पर्यावरणाचे रक्षण आणि सामाजिक जाणीव रुजविण्याचे सुरू असलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. उपसरपंच गोरक्ष पालवे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# शिंदे गटाच्या युवा सेनेत रोहित खैरनार हरिश्चंद्र खैरनार नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाची लाट

दैनिक वादळ वार्ता

धुळे । प्रतिनिधी

साक्री तालुक्यातील पिंपळनेर येथील साई कृष्णा रिसॉर्ट येथे शिंदे गटाच्या शिवसेनेचा भव्य पदाधिकारी मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यात युवा सेनेच्या म्हसदी गटातील विभाग प्रमुखपदी रोहित नवल खैरनार तर शिवसेना शेतकरी आघाडीच्या उपतालुकाप्रमुखपदी हरिश्चंद्र आप्पा खैरनार यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली. या नियुक्त्यांमुळे म्हसदी परिसरातील कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रसंगी मंचावर शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, धुळे जिल्हा प्रमुख तुळशीराम गावित, साक्री विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ. मंजुळाताई गावित, लोकनियुक्त सरपंच अजय सोनवणे व जितेंद्र खैरनार, माजी पंचायत समिती सदस्य राजधर देसले यांची प्रमुख उपस्थिती होती. शिंदे सेनेच्या नेतृत्वावर निष्ठा ठेवून युवकांना संघटनात्मक कार्यात जोडण्याचे कार्य रोहित खैरनार करत आहेत, तर हरिश्चंद्र आप्पा खैरनार हे शेतकरी वर्गाचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी सदैव तत्पर राहिले आहेत. त्यांच्या नियुक्तीमुळे संघटन अधिक मजबूत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. मेळाव्यात पदाधिकाऱ्यांनी नव्या जबाबदाऱ्या स्वीकारताना संघटनेच्या विचारांचा प्रसार गावागावात करण्याचा संकल्प व्यक्त केला. या निमित्ताने उपस्थित मान्यवरांनी नव्या पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. संपूर्ण मेळावा उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला असून पिंपळनेर परिसरात या नियुक्ती बाबत आनंदाचे वातावरण आहे.

# शासनाने सर्वंकष अश्या शेतकरी संरक्षण कायदयाची निर्मिती करावी

दैनिक वादळ वार्ता

अहिल्यानगर । प्रतिनिधी



अहिल्यानगर येथे भारतीय जनसंसदच्या कार्यालयात शेतकरी संरक्षण कायदा या विषयावर राज्यस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत जेष्ठ कृषी वैज्ञानिक डॉ. मुकुंदराव गायकवाड, उच्चन्यायालयातील नामवंत वकील ड. अजितराव काळे, कृषी तज्ज्ञ व कृषी विद्यापीठाचे डॉ. अशोकराव ढगे आणि भारतीय जनसंसदचे प्रदेशाध्यक्ष अशोक सब्बन उपस्थित होते.बैठकीत शेतकऱ्यांच्या हक्कांचे रक्षण, शेतीला कायदेशीर संरक्षण आणि किमान आधारभूत किंमतीला (एमएसपी) कायदेशीर दर्जा देण्याची आवश्यकता यावर विचारमंथन झाले.डॉ.मुकुंदराव गायकवाड म्हणाले की, शेतकऱ्यांच्या बाजूने शोषकावर गुन्हे दाखल करता येणाऱ्या स्वरूपातील संरक्षण देणारा कायदा झाला पाहिजे. अमेरीका, ईस्त्राइलच्या असलेल्या इरमा, ग्रेस्को सारखे कायदे शेतकऱ्यांच्या हितासाठी करण्याचे त्यांनी स्पष्ट केले.ड. अजित काळे यांनी कालबाह्य कायदे रद्द करून, स्थानिक परिस्थिती नुसार नवा कायदा करण्याची मागणी केली. तर डॉ. ढगे यांनी किमान भावाला कायदेशीर आधार देण्यावर भर देण्याबाबत ठोस पाऊल उचलण्याची गरज व्यक्त केली.

प्रदेशाध्यक्ष अशोक सब्बन यांनी या कायद्याचा मसुदा निती आयोग, केंद्र व राज्य लॉ कमिशनकडे पाठवून या कायद्याच्या निर्मिती साठी राज्यभर जनजागृती मोहीम सुरू करण्याची घोषणा केली. शासनाने सर्वंकष अश्या शेतकरी संरक्षण कायदयाची निर्मिती करावी.तसेच कृषी उत्पादनाला शासकीय हमी भावापेक्षा भाव जर कमी मिळालाच तर त्यास विमा संरक्षण देऊन पूर्ण हमी भाव शेतकऱ्यांस मिळण्याचा अधिकार असावे, अशी मागणी या बैठकीत करण्यात आली.

या बैठकीला शहराध्यक्ष रईस शेख, कैलास पठारे, सुनिल टाक, जिल्हाध्यक्ष सुधिर भद्रे, तालुकाध्यक्ष पोपटराव साठे, वीर बहादुर प्रजापती, बाळासाहेब पालवे, अशोक डाके, अशोक भोसले आदी उपस्थित होते

# साई मोहल्ला,साई कोंड,सुर्ले, पवार वाडी, डोंगरोली,आदिवासी वाडी,येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि इतर पक्षातील कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

दैनिक वादळ वार्ता

बोरघर / माणगाव । प्रतिनिधी



माणगाव तालुक्यातील विविध पक्षातील कार्यकर्ते रोज शिवसेनेत पक्षप्रवेश घेत आहेत, कारण शिवसेनेच्या माध्यमातून होत असलेली झपाट्याने विकास कामे तसेच सर्व साधारण कार्यकर्त्यांना मिळत असलेली सन्मानाची वागणूक यामुळेच शिवसेनेत तरुण वर्गासह ग्रामस्थ महिला भगिनी लोकप्रिय नामदार भरतशेठ गोगावले यांच्या लोककल्याणकारी नेतृत्वावर विश्वास ठेवून रोज शिवसेना शिंदे गटात पक्ष प्रवेश करत आहेत.माणगाव तालुक्यातील साई मोहल्ला व साई कोंड येथील राष्ट्रवादीचे कार्यकर्ते दीपेश जंगम, अब्दुल्ला सोलकर, रिहान खेडकर, जुनेद खेडकर, सलमान रहाटविलकर, फरिद सोलकर, उमेद जुवळे, संकेत अडखळे, मेहमूद दळवी, अब्दुल्ला कोंडविलकर, उझेर जुवळे, संकेत बामणे, अजय अधिकारी, शबाब माटवणकर, साद दळवी, हुसेन आंबेकर इत्यादींनी लोकप्रिय नामदार भरतशेठ गोगावले यांच्या लोककल्याणकारी नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेना शिंदे गटात पक्ष प्रवेश केला.

तसेच माणगाव तालुका मोर्बा विभागातील सुर्ले, पवारवाडी, डोंगरोली, आदिवासी वाडी इत्यादी गावातील विविध राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात शिवसेनेत प्रवेश केला.

स्वतःला शिवसेनेचा एक बडा नेता म्हणून घेणारा जरी शिवसेना सोडून गेला असला तरी त्या बदल्यात या भागातील शेकडो कार्यकर्ते रोज शिवसेनेत प्रवेश घेत आहेत, राकेश पवार जिल्हा चिटणीस भाजपा युवा मोर्चा, नरेंद्र मालुसरे सुर्ले गाव अध्यक्ष, दिनेश पवार, विकी तांबे, अनिरुद्ध खैरे, आदित्य मोरे, राज मोरे, सार्थक साळवी, यश शिर्के, रुपेश जाधव, प्रथमेश शिर्के, संकेत जाधव, नीरज कोळी, संजय कोळी, लक्ष्मण जाधव, संदीप काटकर, अजय कोळी, राज साळवी, अनंत जाधव, विजय कोळी, कुंदन कुंडेकर, निकेश साळवी इत्यादींनी लोकप्रिय नामदार भरतशेठ गोगावले, शिवसेना नेते प्रमोद घोसाळकर ॲड. महेंद्र मानकर इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश केला.

# श्री क्षेत्र कपिलधार येथे शिवानंद शिवाचार्य महाराज यांच्या पायी दिंडीचे आगमन; भक्तीचा महासागर ओसंडून वाहिला

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**


त्रिकाल वंदनीय परमपूज्य गुरुवर्य श्री ष.ब्र. १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या चोवीसव्या पायी दिंडीचे तमलूर-मदनापुर येथून श्री क्षेत्र कपिलधार येथे आज भव्य आगमन झाले. या आगमनाने कपिलधार नगरी भक्तीमय झाली असून सर्वत्र मन्मथ स्वामी की जय!, गुरुदेव की जय! या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले. श्री शिवानंद शिवाचार्य महाराज यांच्या दिंडीचे कपिलधार येथे आगमन होताच भाविकांनी पुष्पवृष्टी करून उत्स्फूर्त स्वागत केले.

मन्मथ मुक्तीधाम मठ ते श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी समाधी स्थळापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात आली.या शोभायात्रेत सवाद्य मिरवणूक, फुलांच्या पाकळ्यांची उधळण, अतिशबाजी, आणि गुरूविषयी अपार आदरभाव दिसून आला.

मार्गात भक्तांनी महाराजांच्या पायावर फुलांची पखरण करून त्यांचे आशीर्वाद घेतले.

**दिंडीमध्ये भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग**

दूरदूरच्या गावांमधून हजारो भाविकांनी या दिंडीत




सहभागी होण्यासाठी उपस्थिती दर्शवली. मिरवणुकीत स्त्री-पुरुष, युवा व वृद्धांनी भक्तिगीतांच्या तालावर नृत्य करत वातावरण मंगलमय केले. दिंडीमध्ये चालणारे जय मन्मथ स्वामी, हर हर शिवाचार्य अशा घोषांनी वातावरण अधिकच पवित्र झाले.

**पाद्यपूजा व पुष्पवृष्टी**

श्री मन्मथ स्वामी समाधी स्थळी पोहोचल्यावर श्री शिवानंद शिवाचार्य महाराज यांची पाद्यपूजा करून त्यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली.गुरुवर्यांनी समाधीस्थळावर मस्तक टेकवून मन्मथ स्वामींना वंदन केले व सर्व भक्तांसाठी आशीर्वाद दिला. या प्रसंगी महाराजांनी भक्तांशी संवाद साधत गुरूभक्ती, साधना आणि समाजसेवेचे महत्त्व अधोरेखित केले.

**अभूतपूर्व स्वागताने महाराज भावुक**

गुरुवर्यांच्या स्वागतासाठी कपिलधार ग्रामस्थ, मठातील सेवक व स्थानिक भक्तांनी विशेष तयारी केली होती. संपूर्ण कपिलधार नगरी फुलांनी, पताकांनी व शुभ्र रांगोळीने सजवण्यात आली होती. या अभूतपूर्व स्वागताने शिवाचार्य महाराज भावुक झाले. त्यांनी समाधान व्यक्त करत सांगितले,भक्ती आणि प्रेम हेच आमचे खरे वैभव आहे. मन्मथ स्वामींच्या कृपेने हे पवित्र स्थळ अधिक तेजोमय होईल.

**समारोप व आशीर्वचन**

कार्यक्रमाच्या शेवटी महाराजांनी सर्व उपस्थितांना आशीर्वचन दिले आणि समाजात धर्म, सदाचार आणि एकतेचा संदेश देत प्रसंगी उपस्थित राहिलेल्या भाविकांचे आभार मानले.यावेळी मठ परिसरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

## वरपगाव येथील रहिवाशी असलेल्या श्रीमती पुष्पादेवी वैजनाथराव देशमुख यांचे पुणे येथे दुख:द निधन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील वरपगावचे भूमिपुत्र व महाराष्ट्र राज्याच्या पाटबंधारे विभागातून (सध्याचा जलसंपदा विभाग) अधीक्षक अभियंता (सुप्रिंटेंडिंग इंजिनियर) म्हणून सेवानिवृत्त झालेले कै. वैजनाथराव हनुमंतराव देशमुख यांच्या पत्नी श्रीमती पुष्पादेवी वैजनाथराव देशमुख यांचे सोमवार दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी पुणे येथे दुःखद निधन झाले. त्या ८२ वर्षाच्या होत्या. त्या अत्यंत कुटुंबवत्सल व प्रेमळ होत्या.वरपगाव व परिसरातील अनेकांना त्यांनी नोकरी व व्यवसायासाठी खूप प्रोत्साहन दिले तसेच आवश्यकतेनुसार मदत, सहकार्य व मार्गदर्शन केले आहे.त्यामुळे त्यांच्या निधनाचे वृत्त समजतात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.



त्यांच्या मागे पुणे येथे स्थित मुलगा निवृत्त वैद्यकीय अधिकारी व सध्या कृषी व बांधकाम क्षेत्रात कार्यरत डॉ. अविनाश देशमुख तसेच नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथे स्वतःचे इंग्लिश मीडियम स्कूल असलेले आणि स्वतःच्या सुसज्ज हॉस्पिटलच्या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असलेले सुप्रसिद्ध जनरल फिजिशियन डॉ.राहुल देशमुख अशी दोन मुले, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा तिसरा मुलगा कै.अतुल देशमुख हा पुणे येथे बांधकाम व्यवसायात होता त्याचे गतवर्षी निधन झाले.कैलासवासी पुष्पादेवी देशमुख यांचे संपूर्ण कुटुंब सुशिक्षित असून एक नातू डॉक्टर, तीन नातू इंजिनीयर तर दोन नाती आर्किटेक्ट आहेत.महाराष्ट्र राज्याचे माजीमंत्री आमदार श्री. प्रकाशदादा सोळुंके यांच्या त्या मावशी होत तर शेतकरी कामगार पक्षाचे दिवंगत नेते भाई उद्धवराव पाटील यांची कन्या त्यांची स्नुषा आहे. राजकीय,सामाजिक, वैद्यकीय,अभियांत्रिकी क्षेत्रातील दिग्गजव्यक्तींशी कौटुंबिक नातेसंबंध असलेल्या कै.पुष्पादेवी देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजलीअर्पण करण्यात आली आहे.

## सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक अशोक थोरात सेवानिवृत्त : सहकाऱ्यांच्या वतीने सपत्नीक निरोप

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक म्हणून आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक अशोक थोरात हे विहित वयोमाना नुसार सेवानिवृत्त झाले असून त्या निमित्त त्यांना युसुफवडगाव पोलीस स्टेशन आणि त्यांच्या सहकारी व मित्र परिवाराच्या यांच्या वतीने निरोप देण्यात आला.युसुफवडगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक अशोक थोरात हे विहित वयोमाना नुसार दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी सेवा निवृत्त झाले आहेत. त्या निमित्त दि. ३१ ऑक्टोबर रोजी युसुफवडगाव



पोलिस ठाण्याचे अधिकारी आणि सहकारी यांच्यासह त्यांचे मित्र व महसूल कर्मचारी संघटना यांच्या वतीने निरोप समारंभ आयोजित केला होता. यावेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे, पोलिस उपनिरीक्षक मांजरे, पोलिस उपनिरीक्षक मोरे यांच्यासह सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक, पोलिस हवालदार आणि त्यांचे सहकारी यांनी सेवानिवृत्त सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक अशोक थोरात यांचा सपत्नीक सत्कार करून त्यांना निरोप दिला.पशु प्रेमी अशोक थोरात :- पोलिस खात्यात सेवा करून सुद्धा सेवानिवृत्त सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक अशोक थोरात यांना श्वान आणि घोडे पा छंद असून त्यांच्याकडे विविध जातीचे श्वान आणि घोडे देखील आहेत.


## विठ्ठल फपाळ याचे सि. ए.परिक्षेत घवघवीत यश

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । दर्शन डोंगरे**

तालुक्यातील ग्रामीण भागातून व वारकरी संप्रदायात वाढ झालेला भागवताचार्य ह.भ.प.आदिनाथ महाराज फपाळ यांचे नातू व कृषी उत्पन्न बाजार समितीचे लेखापाल उद्धव फपाळ यांचे चिरंजीव विठ्ठल फपाळ याने सि.ए. परीक्षेत १६८ मार्क घेत घवघवीत यश संपादन केले आहे.

माजलगाव तालुक्यातील अलापूर येथील मूळ रहिवाशी असलेला विठ्ठल फपाळ याने १० वी पासूनच सि. ए. होण्याची जिद्द उराशी बाळगुन त्याने १२ नंतर पुणे येथील सिम्बॉयसेस या कॉलेजमध्ये शिक्षण घेतले व आताच सि. ए. परीक्षेच्या (द्वितीय वर्ष)लागलेल्या निकालात घवघवीत यश संपादन केले आहे

या यशा बद्दल त्याचे आजोबा भावताचार्य



ह.भ.प.आदिनाथ महाराज फपाळ,तसेच ह.भ.प.पांडुरंग महाराज शितोळे, मुंबई बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक, सभापती जयदत्त नरवडे,उपसभापती श्रीहरी मोरे, माजी सभापती नितिन नाईकनवरे,शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले,सचिव हरिभाऊ सवणे,मनोहर शिंगणे यांनी अभिनंदन केले

## बदामराव पंडितांनी घेतली पंकजाताईंची भेट निवडणुकीसह मतदारसंघातील कामांबाबत चर्चा

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केल्यानंतर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी मुंबई येथे भाजपाच्या राष्ट्रीय सरचिटणीस तथा महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्री पंकजाताई मुंडे यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसह गेवराई विधानसभा मतदारसंघातील विविध कामांबाबत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती माजी सभापती युधाजित पंडित यांनी दिली.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचा भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश घेण्यात आलेला आहे. या प्रवेशानंतर पहिल्यांदाच मुंबई येथे राज्याच्या



पशुसंवर्धन पर्यावरण आणि हवामान बदल कॅबिनेट मंत्री तथा भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सरचिटणीस पंकजाताई मुंडे यांची माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी भेट घेतली. यावेळी बीड जिल्हा परिषद चे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवा नेते रोहित पंडित यांच्यासह भाजप पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. या बैठकीमध्ये गेवराई नगर परिषद आणि पंचायत समितीसह जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी, त्यासोबतच गेवराई विधानसभा मतदारसंघातील विविध कामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. भाजपा पक्ष संघटन बांधणी यासोबत शहरासह ग्रामीण भागात भागातील पदाधिकाऱ्यांना बळ आणि स्वाभिमान देण्याच्या संदर्भातही सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती माजी सभापती युधाजित पंडित यांनी दिली असून, या बैठकीतून भाजप पक्ष विस्तार आणि जनतेच्या सेवेसाठी नवी ऊर्जा निश्चित मिळाल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

## रविंद्र जोगदंड यांच्या मातोश्रींचे निधन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

रिपाइंचे बीड जिल्हा संघटक रवींद्र जोगदंड यांच्या मातोश्री चंपाबाई साहेबराव जोगदंड वय (८० वर्ष) यांचे साळेगाव तालुका केज येथे दि. ४ नोव्हेंबर रोजी ११:४५ वाजता निधन झाले आहे.



साळेगाव ता. केज येथील रहिवाशी आणि बीड जिल्हा रिपाइं (आठवले) चे संघटक रवींद्र जोगदंड यांच्या आई चंपाबाई साहेबराव जोगदंड यांचे दि. ४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११:४५ वा. च्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८० वर्षाचे होते. त्यांना दोन मुले आणि एक मुलगी असा परिवार होता. साळेगाव येथे शेलगाव गांजी रस्त्या लगत दि. ४ नोव्हेंबर रोजी दुपारी ४:०० वा. च्या सुमारास त्यांच्या शेतात त्यांच्या पार्थिवावर बौद्ध पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध स्तरातील प्रतिष्ठित आणि मान्यवर उपस्थित होते.दरम्यान मागील आठवड्यातच त्यांची मुलगी आशाबाई रघुनाथ बचुटे यांचे निधन झाले होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सुना नातवंडे व जावई असा मोठा परिवार आहे. त्या अत्यंत प्रेमळ स्वभावाच्या होत्या.

# अर्ध्या एकरात घेवडा झाला केवढ्याचा तर म्हणे झाला सहा लाखाचा

### अर्ध्या एकरात साडेसहा ते सात लाखाचे उत्पन्न काढणारा भागवत मुळे

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

शेती हा जरी आतबट्ट्याचा खेळ म्हणून निसर्गावर अवलंबून असला तरी प्रत्येक संकट ही संधी समजून त्या प्रमाणे नियोजन केले आणि अभ्यास करून जर पिकाची लागवड केली तर हमखास यश मिळण्याची शक्यता जास्त असते. अशाच केज तालुक्यातील एका अल्पशिक्षित युवा शेतकऱ्याने त्याच्या अर्ध्या एकर पेक्षा कमी क्षेत्रात घेवडा या पिकाचे आता पर्यंत सुमारे पाच लाखाचे उत्पन्न घेतले आहे. तसेच या पिकात दोन अंतर पिके सुद्धा घेतली आहेत त्याचे सुद्धा सुमारे दीड लाखाचे उत्पन्न मिळाले असून आणखी तीन ते चार लाखाचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे.

केज तालुक्यातील एका अल्पशिक्षित युवा शेतकरी भागवत मुळे यांनी त्याच्या अवघ्या अर्ध्या एकर



पेक्षा कमी क्षेत्रात त्यांनी घेवडा लावला. त्याला व्यवस्थित खत आणि पाण्याचे नियोजन करून वेलीला आधार देण्यासाठी बाबूंच्या काठ्या आणि तारेची बांधणी केली. त्या नंतर सुमारे ६० ते ७५ दिवसात त्याला फुले लागली आणि फळधारणा झाली. भागवत मुळे या घेवड्याची पत्नी आणि मुले यांच्या सहाय्य स्वतः तोडणी करीत आहेत. एका आठवड्याला सुमारे दहा क्विंटल म्हणजेच एक टन एवढा माल निघत आहे. शेजारच्या धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथील बाजार पेठेत व्यापाऱ्या कडून त्यांच्या वाणाला चांगली मागणी आहे.

आता पर्यंत सुमारे २०० क्विंटल म्हणजेच २० टनाच्या आस पास माल निघाला असून प्रति क्विंटल ४०००, ते ६००० रु. असा भाव मिळाला आहे. चार महिन्या पासून याची विक्री सुरू आहे.आंतर पिकातूनही निघाले चांगले उत्पन्न :- याच घेवड्याच्या पट्ट्या मध्ये त्यांनी प्रथम पत्ता कोबी चे पीक घेतले. कोबीने त्यांना सुमारे ४० हजार रु मिळवून दिले. कोबी निघाल्या नंतर त्याच घेवड्याच्या मध्ये त्यांनी कोथिंबीर लावली आणि कोथिंबीर विक्रमी भाव मिळाला. सुमारे दीडशे ते

> **जरी अतिवृष्टी झाली किंवा अवर्षण असले तरी जर शेतकऱ्याचा एक जरी कोपरा पिकला तरी शेतकऱ्याचे दारिद्र्य संपते. पण त्यासाठी चिकाटी, मेहनत आणि चालू घडामोडीचा अंदाज घेऊन पिकाची निवड करायला हवी.**
> **-भागवत मुळे, शेतकरी**

अडीचशे रु किलो दराने त्यांनी कोथंबीर विकली. त्या कोथिंबीरीचा देखील त्यांना ७५ हजार ते ८० हजार रु. चे उत्पन्न मिळवून दिले.

_आता याच पिकात वाटाणा घेण्याचा संकल्प :- आता कोथिंबीर संपली आता त्याच पिकात वाटाणा पिकाची लावणी करणार आहेत. त्यातून सुद्धा चांगले उत्पन्न मिळू शकते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077